ICICI Bank Limited
ICICI Bank Towers
Bandra-Kurla Complex
Bandra (E) Mumbai-400051.

**सप्टेंबर 24, 2013**

## आयसीआयसीआय बँकेकडून 'पॉकेट्स बाय आयसीआयसीआय बँक' ची घोषणा

- **फेसबुकवर जगातील अशा प्रकारचे पहिले एप**
- **या एपमुळे ग्राहकांना फेसबुकवर विविध वित्तीय व्यवहार करणे शक्य**

**मुंबई :** भारतातील खासगी क्षेत्रातील सर्वात मोठी बँक असणा-या आयसीआयसीआय बँकेने आज **'पॉकेट्स बाय आयसीआयसीआय बँक'** या नव्या एपची घोषणा केली आहे. या एपच्या माध्यमातून ग्राहकांना फेसबूक या सोशल मीडिया साईट्सच्या माध्यमातून विविध बँकिग सेवा मिळवता येणार आहे.

फेसबुकवर जगातील अशा प्रकारचे पहिले एप असणारे, 'पॉकेट्स बाय आयसीआयसीआय बँक' , फेसबुकवर असताना ग्राहकांना बँकिंगची सुविधा पुरवते. युवा आणि सोशल मीडियाशी बँक जोडली जात असल्याचे महत्वही ते अधोरेखित करते.

या प्रसंगी बोलताना, **चंदा कोचर, एमडी आणि सीईओ, आयसीआयसी बँक** म्हणाल्या, "बँकिगसाठी तंत्रज्ञानातील नाविन्यतेचा वापर करण्यासाठी आमची बँक कायम आघाडीवर असते. 'पॉकेट्स बाय आयसीआयसीआय बँक' ची घोषणा करून आम्ही जगातील फेसबुकवर सर्वसमावेशक बँकिग एप आणले आहे. खयाल आपका, या आमच्या तत्वज्ञानाशी हा उपक्रम सुसंगत असून त्या माध्यमातून ग्राहकांना बँकिंग सेवा अधिक सुलभ आणि सोपे करून देणारी उत्पादने आणि सेवा आम्ही प्रदान करतो. 'पॉकेट्स बाय आयसीआयसीआय बँक' च्या माध्यमातून, अनेक प्रकारचे व्यवहार करण्यासाठी फेसबुकवर भरपूर वेळ घालवणा-या तरूण ग्राहकांना सोशल मीडिया साईट न सोडता व्यवहार करण्यास मदत होणार आहे."

फेसबुकचे भारतभरात 82 मिलियन उपभोक्ते असून त्यापैकी 40%, 30 वयवर्षाच्या खाली आहेत.

हे एप म्हणजे 'तुमच्या बँके' चा नैसर्गिक विकास आहे. बँकेने गेल्या वर्षी सुरु केलेल्या फेसबुक एपमुळे, फेसबुकवर असताना ग्राहकांना बचत खात्याचे तपशील व विधाने तसेच चेकबूक ऑर्डर करणे आणि डेबिट कार्ड अद्यावत करणे शक्य झाले आहे.

'पॉकेट्स बाय आयसीआयसीआय बँक' खालील महत्त्वाच्या सुविधा प्रदान करते-

- **स्प्लिट एन शेअर:** ग्राहकांना ग्रुपच्या बाहेर पडून खर्चाची माहिती करून घेणे आणि फेसबुक मित्रांशी शेअर करण्याची परवानगी ते देते. बाकी असलेल्या पेमेंटबद्दल मित्रांना आठवण करून देण्यासाठी संदेश पाठवण्याचा पर्यायही हे एप उपलब्ध करून देते.

- **मित्राला रक्कम अदा करा:** मित्रांचे बँक अकौंटचा तपशील, बँक अकौंट नंबर, ब्रॅण्च आयएफएससी (IFSC) कोड इ. बाबी माहित नसताना निधी ट्रान्सफर करण्याची परवानगी हे एप ग्राहकांना देते. या सुविधेच्या माध्यामातून ग्राहक इलेक्ट्रॉनिक कूपनची निर्मिती करू शकतात आणि www.icicibank.com वर त्याला मित्रांची मान्यता मिळू शकते.

- **प्रीपेड मोबाईल रिचार्ज:** पॉकेट्स बाय आयसीआयसीआय बँक' च्या माध्यमातून ग्राहक फेसबुकवरून तात्काळ प्रीपेड मोबाईल रिचार्ज करू शकतात.

- **सिनेमा तिकीट बुकींग:** उपभोक्ते त्यांच्या फेसबुकमित्रांसोबत, आवडत्या सिनेमाचे नियोजन करू शकतात आणि पॉकेट्स बाय आयसीआयसीआय बँक' च्या माध्यमातून तिकीटही बुक करू शकतात.

एपच्या माध्यमातून ग्राहक बिग-वित्तीय व्यवहारही करू शकतो. त्यामध्ये- सारांश तसेच बचत खात्याच्या मिनी स्टेटमेंटचे दर्शन, क्रेडीट कार्डचा तपशील जाणून घेणे आणि डिमॅट होल्डींग स्टेटमेंट मिळवणे यांचा समावेश होतो. या एपच्या माध्यमातून ग्राहक मुदत किंवा आवर्ती ठेव उघडू शकतो, चेकबुक ऑर्डर करू शकतो, चेक पेमेंट थांबवू शकतो आणि डेबिट कार्ड अद्ययावत करू शकतो.

फेसबुकचा युजर आयडी लॉगिंग करून, त्यानंतर आयसीआयसीआयच्या अधिकृत फेसबुक पेजवर (www.facebook.com/icicibank) जाऊन, 'पॉकेट्स बाय आयसीआयसीआय बँक' टॅबवर क्लिक करून ग्राहक, या एपचा लाभ घेऊ शकतात. डेबिट कार्ड नंबर आणि पीआयएन नंबरची एंट्री करून ते अर्जाची नोंदणी करू शकतात. त्यांच्या प्रोफाईलला "एप्स" नावाखाली अर्ज जोडला जाईल. नोंदणी प्रक्रियेदरम्यान, ग्राहकांना नवीन चार अंकी पीआयएनची निवड करावी लागेल, त्याचा नंतरच्या लॉगिन्ससाठीही उपयोग होऊ शकतो.

'पॉकेट्स बाय आयसीआयसीआय बँक' मध्ये सुरक्षेची अनेक वैशिष्ट्ये असून त्यामुळे सुरक्षित सामाजिक बँकिंगच्या अनुभवाची खात्री पटते.

- **सुरक्षा** : एपमध्ये 128 बिच एन्क्रीपश्नसचा वापर होत असल्यामुळे ग्राहकाची माहिती सुरक्षित राहते.
- **सुरक्षित ब्राऊजिंग:** https वर रन होत असल्यामुळे व्यवहार सुरक्षित राहतात.
- **सुरक्षित सुरूवात** : ग्राहकाच्या डेबिट कार्ड नंबर आणि पीआयएन नंबरची अकौंट नोंदणीच्या वेळी खात्री होत असल्यामुळे गैरवापर टाळता येतो.
- **व्यवहार सुरु करताना व्यवहाराच्या खरेखुरेपणाची पडताळणी:** प्रत्येक व्यवहारासाठी, एकमेव जलदगतीने निर्माण केलेला ओटीपी (OTP- वन टाईम पासवर्ड) असून, ग्राहकाने व्यवहाराला सुरुवात केली आहे, हे तपासून पाहण्यासाठी तो ग्राहकाच्या मोबाईल नंबरवर पाठवला जातो.

'पॉकेट्स बाय आयसीआयसीआय बँक'संबंधी अधिक जाणून घेण्यासाठी भेट द्या (www.icicibank.com/pockets) किवा (www.facebook.com/icicibank).

**आयसीआयसीआय बँके लि.संबंधी-** आयसीआयसी बँके लि. (एनवायएसई-आयबीएन) ही भारतातील खासगी क्षेत्रातील सर्वात मोठी तर एकूणात दुस-या क्रमाकांची बँक आहे. 31 मार्च 2013 रोजी, तिची एकूण मालमत्ता युएस $ 124 आहे. खासगी क्षेत्रातील विमा कंपन्या, सिक्युरिटी फर्म्स, म्युच्युअल फंड्स आणि खासगी इक्विटी फर्म्सचा, आयसीआयसीआयच्या सहयोगी कंपन्यांमध्ये समावेश होतो. भारतासह इतर 19 देशांमध्ये तिचे कार्य सुरू आहे. अधिक माहितीसाठी भेट द्या- www.icicibank.com

ICICI Bank Limited
ICICI Bank Towers
Bandra-Kurla Complex
Bandra (E) Mumbai-400051.

*Except for the historical information contained herein, statements in this release, which contain words or phrases such as 'will', 'would', etc., and similar expressions or variations of such expressions may constitute 'forward looking statements'. These forward-looking statements involve a number of risks, uncertainties and other factors that could cause actual results to differ materially from those suggested by the forward-looking statements. These risks and uncertainties include, but are not limited to our ability to obtain statutory and regulatory approvals and to successfully implement our strategy, future levels of non-performing loans, our growth and expansion in business, the adequacy of our allowance for credit losses, technological implementation and changes, the actual growth in demand for banking products and services, investment income, cash flow projections, our exposure to market risks as well as other risks detailed in the reports filed by us with the United States Securities and Exchange Commission. ICICI Bank undertakes no obligation to update forward-looking statements to reflect events or circumstances after the date thereof. All reference to interest rates, penalties and other terms and conditions for any products and services described herein are correct as of the date of the release of this document and are subject to change without notice. The information in this document reflects prevailing conditions and our views as of this date, all of which is expressed without any responsibility on our part and is subject to change. In preparing this document, we have relied upon and assumed, without independent verification, the accuracy and completeness of all information available from public sources. ICICI Bank and the "I man" logo are the trademarks and property of ICICI Bank. Any reference to the time of delivery or other service levels is only indicative and should not be construed to refer to any commitment by us. The information contained in this document is directed to and for the use of the addressee only and is for the purpose of general circulation only.*

**For Press Queries:**

Sujit Ganguli
Senior General Manager and Head- Corporate Communications & Brand
ICICI Bank
Mumbai – 51
Email – ganguli.sujit@icicibank.com